**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग - दोन**

**सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ / कार्तिक २९, १९४५ (शके)**

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**१३९.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती. एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १८ निवेदने सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ व्दारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. १८० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३५ निवेदने सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. १४५ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३३ निवेदने सोमवार, दिनांक ३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७४ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ११२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १४ निवेदने सोमवार, दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७९ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. तसेच, ९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४१ निवेदने सोमवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२२ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. एकूण ५७ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०७ निवेदने गुरुवार, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२५ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ५० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १० निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २० नोव्हेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. ७१४

**श्री. विकास ठाकरे, श्री. विजय वडेट्टीवार, श्री अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल केदार, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७१४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नागपूर येथील अंबाझरी तलावाशेजारील नागपूर महानगर पालिकेत अंदाजे ६० वर्षापूर्वी आवंटीत केलेल्या खसरा क्र.१, नगर भूमापन क्र.१ या एकूण ४४ एकर जमिनीवर बांधलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व उद्यान परिसरातील जमीन असणे, ही जमीन जिल्हाधिकारी नागपूर यांनी दि.२०/०९/२०१८ रोजी आदेश देऊन सदर जमीन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना भाडेपट्टयावर देणे, मात्र या आदेशामुळे सदर महामंडळाने कट कारस्थान करुन ही जमीन खासगी कंपनीला अनुसचित लाभ मिळवून देण्यासाठी बेकायदेशीरपणे शासनाची दिशाभूल व फसपणूक करुन मेसर्स गरुडा अॅम्युशमेंट पार्क या खासगी कंपनीस हस्तांतरीत करणे, या कंपनीने कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची परवानगी न घेता गुप्तपणे अंबाझरी तलाव जुने "डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन" उध्दवस्त करणे, यासंदर्भात येथील आंबेडकरी जनतेत असलेली चिड लक्षात घेता या कंपनीची चौकशी करुन कारवाई होणे अपेक्षित असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

### मा.मंत्री, (पर्यटन) यांचे निवेदन

मौजे, अंबाझरी, जि. नागपूर येथील महसुल व वन विभाग यांचेकडून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास सार्वजनिक खाजगी भागिदारी (PPP) तत्वावर विकास करण्याकरीता भाडेपट्यावर उपलब्ध झालेल्या जागेवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन जमीनदोस्त केल्याबाबत प्राप्त तक्रारी / पत्रव्यवहार / आंदोलने याबाबत निःपक्ष व वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, नागपूर यांना दिनांक १५ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या. त्यानुसार विभागीय आयुक्त, नागपूर यांनी दिनांक १५ मे, २०२३ च्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे.

विभागीय आयुक्त, नागपूर यांनी पत्र दि.१५/०५/२०२३ अन्वये सादर केलेल्या अहवालातील निष्कर्षानुसार मौजे, अंबाझरी, जि. नागपूर येथील जागेवरील जमीनदोस्त झालेल्या वास्तुबाबत लोकभावना, समाज भावना व सामाजिक वारसा विचारात घेऊन आवश्यक त्या कायदेशीर बाबी प्राप्त करुन घेऊन विषयांकित वास्तू जमीनदोस्त झाल्याच्या घटनेबाबत उद्भवलेल्या वादाच्या अनुषंगाने निर्णय होईपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन पूर्वी अस्तित्वात असणाऱ्या ठिकाणी चालू असणारी विकासकामे स्थगित ठेवणेबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास १९/०६/२०२३ च्या पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे.

RGTA-H-1323-(750-10-2023)

* * * * *

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १०२३**

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"महाड एमआयडीसी कारखान्यातील इथिनोल ऑक्साईड प्लँटला भीषण आग लागल्याची घटना माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास आली असणे, तसेच, ८ दिवसात तुर्भे एमआयडीसीतील कापड कंपनीला आग लागल्याची दुसरी घटना ही निदर्शनास आली असणे, त्यामध्ये, दोन्ही ठिकाणी आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अस्पष्ट असणे, त्यामध्ये, राज्यात अनेक ठिकाणी आगीच्या घटना वाढत असल्याचे निदर्शनास येत असूनही त्यावर नियंत्रण नसल्याने तर काही ठिकाणी नियमांचे पालन होत नसल्याने आगीच्या घटना वाढत असणे, त्यामुळे, आगीच्या वाढत्या घटना पाहता नियमांचे काटेकोर पालन होण्याची गरज असणे, तसेच, वेळोवेळी फायर ऑडीट करण्याची गरज असणे, तसेच, नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात आगीच्या घटना घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

### मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

राज्यात महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ स्थानिक प्राधिकरणे व नियोजन प्रधिकरण क्षेत्रामध्ये दिनांक ०६ डिसेंबर, २००८ पासून अमंलात आले. आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनाबाबत या कायद्याच्या अनुषंगाने प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. विविध इमारतींना कोणती आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना असणे आवश्यक आहे. याबाबतची सविस्तर माहिती महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या अनुसूची-एक मध्ये देण्यात आलेली आहे. सदर अग्निशमन अधिनियम, २००६ च्या कलम ३ अन्वये सुसज्ज अग्निशमन यंत्रणा बसवून ती नेहमी दुरुस्त व कार्यक्षम स्थितीत ठेवण्याची जबाबदारी इमारतीचे मालक/ भोगवटादार यांची आहे.

"अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षक (Fire & Life Safety Auditor) पूर्वी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मध्ये "अग्निशमन ऑडिट" बाबत तरतूद नव्हती. त्यामुळे शासनाने शासकीय / निम शासकीय / सार्वजनिक उपक्रमांच्या इमारतींची व पब्लीक बिल्डींग, मॉल्स, सिनेमागृहे, इत्यादींचे फायर ऑडिट करण्याबाबत दिनांक २२.०६.२०१२ व २५.०६.२०१२ अन्वये परिपत्रके निर्गमित केलेली आहेत. तसेच, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यामध्ये दोन वर्षातून एकदा आस्थापनांनी "अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षण" करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सुधारित "महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०२३" दिनांक ३० मे, २०२३ पासून अमलांत आलेला आहे. त्यानुसार लवकरच "अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षक (Fire & Life Safety Auditor)" नेमण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

*************************

शेटा - एच - १२६८(७०० - १०-२३)

लक्षवेधी सूचना क्रमांक १४६७.

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्री. समाधान अवताडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

“माहे फेब्रुवारी २०२३ वा त्या सुमारास सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील अत्यंत महत्त्वाची व पवित्र समजली जाणारी चंद्रभागा नदीच्या पाण्याचे व पंढरीचा यमाई तलावातील पाण्याचे होणाऱ्या प्रदूषणाच्या समस्येने गंभीर रूप धारण करणे, पंढरपूर शहराची वाढती लोकसंख्या आणि दररोज येणाऱ्या भाविकांची वाढत असलेली संख्या लक्षात घेता शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा अपुरी ठरत असणे, परिणामी दररोज लाखो लिटर सांडपाणी प्रक्रिया न करताच थेट चंद्रभागा नदीत जाऊन मिसळत असणे, सध्या पंढरपूर शहराची लोकसंख्या सुमारे एक लाख २५ हजार इतकी असून दररोज १३ ते १४ एम एल डी सांडपाणी वापरून सोडले जात असणे, परंतु शनिवार-रविवार, विविध यात्रा व एकादशीच्या दिवशी हे सांडपाणी जवळपास १६ ते १८ एम एल डी पर्यंत वाढत असणे, सध्या शहरात केवळ १५.५ एमएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यरत असणे, त्यामुळे वाढलेले अतिरिक्त सांडपाणी हे कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करताच चंद्रभागा नदीच्या पात्रात मिसळत असणे, यावर उपाय म्हणून मी स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने मुख्य कारण असलेली सांडपाण्याचा निचरा होण्याकरिता आवश्यक अशी पूर्ण क्षमतेची नवीन भुयारी गटार योजना राबविण्याची मागणी केलेली असणे, त्यानुसार पंढरपूर नगर परिषदेने २० लाख लोकांच्या सांडपाण्याची निचरा करणारी नवीन भुयारी गटार योजना सविस्तर प्रकल्प अहवाल बनवला असणे, सदर योजनेमध्ये भुयारी गटार सांडपाणी व्यवस्था, २ पंपींग स्टेशन, रायझींग पाईपलाईन, २ सेवरीज ट्रिटमेंट प्लॅन्ट, टर्शरी ट्रीटमेंट प्लान्ट, रिसायकल वॉटर वितरण व्यवस्था, रिसायकल वॉटर ESR व GSR फिल्टर व्यवस्था इत्यादी कामांचा समावेश असणे, परंतु सदर ५ एम एल डी क्षमतेचे दोन नवीन प्रकल्पाचे प्रस्ताव तयार असून देखील मागील १० महिन्यांपासून हा प्रस्ताव नगरपालिकेतच पडून असणे, तसेच सदर प्रदूषण रोखणे करता तत्कालीन मा.मुख्यमंत्र्यांद्वारे "नमामी चंद्रभागा प्राधिकरणाची" स्थापना करण्यात येणे, तत्कालीन अर्थमंत्री यांनी उल्लेख केल्यानुसार सदर प्राधिकरणाचे मुख्य काम नदीत मिसळणारे सांडपाणी बंद करणे, उगमापासून संगमापर्यंत पाणी स्वच्छ करणे, पंढरपूर परिसरात दोन्ही बाजूंना नदीकाठावर झाडे लावणे, घाट सुशोभिकरण करणे, तसेच शहरात वारीकाळात वारकऱ्यांना पूर्ण क्षमतेने शौचालय उभारणे, इत्यादी महत्त्वाच्या कामांचा आराखड्यात समाविष्ट करण्याचा उद्देश असणे, परंतु स्थापनेनंतर अद्यापर्यंत आराखडा तयार करण्यात आला नसल्याची बाब उघडकीस येणे, तसेच हजारो घरातील मैला मिश्रित सांडपाणी यमाई तलावत कोणतेही प्रक्रिया न करता सोडत असल्याने तलावाचे रूपांतर सांडपाणी साठवणारे टक्के म्हणून झालेले असणे तलावाच्या परिसरातील जलचर जीवांसह सभोवताली राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य ही सदर प्रदूषणामुळे धोक्यात आलेले असणे सदरचा तलाव हा शेकडो वर्ष जुना असून शहरातील सर्वात मोठा तलाव असणे, सदर तलावाचे क्षेत्रफळ जवळपास ८० एकर इतके असणे, प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे नदीच्या व तलावाच्या प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होणे, नदीचे पावित्र्य नष्ट होत असल्याचे बघून येथील स्थानिक नागरिक, वारकरी व भाविकांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र चीड निर्माण होणे, सबब पवित्र अश्या चंद्रभागा नदीचे व यमाई तलावाचे प्रदूषण कमी करण्याकरता नमामी चंद्रभागा प्राधिकरणाची बैठक घेऊन आराखडा तयार करून व नवीन भुयारी गटार योजनेस मंजुरी देऊन आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना”

ROTA-H-1299-1 (750-10-2023)  कृ.मा.प.

## श्री. एकनाथ शिंदे, मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

पंढरपूर शहराची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ९८,९२३ इतकी आहे. या व्यतिरिक्त यात्रा कालावधीत अंदाजे १० ते १२ लाख भाविक शहरात येत असतात. तसेच प्रत्येक महिन्याच्या एकादशीला अंदाजे ५० हजार इतके भाविक व दैनंदिन १० हजार अंदाजित भाविक भेट देत असतात.

पंढरपूर शहरामध्ये प्रतिदिन १२.८ दशलक्ष लिटर घरगुती सांडपाणी निर्माण होते. दरम्यान आषाढी वारीच्या वेळेत शहरात २८ दशलक्ष लिटर प्रतिदिन एवढे सांडपाणी निर्माण होते. पंढरपूर नगरपरिषद यांच्याकडे पंढरपूर शहरातून निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी नगरपरिषदेचे शहरात १८ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित आहे. त्यापैकी १५.५ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचा गोपाळपूर येथे अद्ययावत एसबीआर तंत्रज्ञान असलेला सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे व तो कार्यान्वित आहे. यामधील प्रक्रियाकृत सांडपाणी परिसरातील शेतीकरीता वापरण्यात येते. या व्यतिरिक्त राज्य नगरोत्थान अभियानांतर्गत सन २०१९ पासून २.५ दशलक्ष लिटर क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वित आहे.

पंढरपूर शहराची तरंगती लोकसंख्या विचारात घेता, पंढरपूर नगरपरिषदेने टप्पा क्रमांक ४ मध्ये भुयारी गटार योजनेचा सुधारित प्रकल्प अहवाल तयार केला आहे. यामध्ये एकूण ५ दशलक्ष लिटर क्षमतेचे २ मलशुद्धीकरण केंद्र, ३ पंपिंग स्टेशन व सुधारित संकलन वाहिन्या प्रस्तावित केल्या आहेत. यासाठी अंदाजपत्रकीय किंमत रुपये १०३.४२ कोटी इतकी असून त्याची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक तपासणी करण्यात येत आहे. सदर तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या राज्यस्तरीय नगरोत्थान अभियानांतर्गत प्रस्ताव सादर करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

पंढरपूर नगरपरिषदेने ५ दशलक्ष लिटर क्षमतेचे २ मलशुद्धीकरण केंद्र याचा प्रकल्प अहवाल तयार केला असून त्यामध्ये यमाई तलावात येत असलेल्या टाकळी ग्रामपंचायत परिसरातील सांडपाणी प्रक्रियेसाठी प्रस्तावित प्रकल्प अहवालात मलशुद्धीकरण केंद्राची वाढीव तरतूद प्रस्तावित केली आहे. सदर मलशुद्धीकरण केंद्र अस्तित्वात आल्यानंतर यमाई तलावात सांडपाणी मिश्रित होऊ शकणार नाही.

शासनाने चंद्रभागा नदी निर्मळ, पवित्र व प्रदुषणमुक्त करुन तिचे संवर्धन करण्यासाठी नमामि चंद्रभागा अभियान राबविण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी दिनांक १२/८/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली नमामि चंद्रभागा प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. त्यामध्ये चंद्रभागा नदीच्या पाण्याची पातळी कायम रहावी, यासाठी बंधारा बांधणे, नदीचा पर्यावरणीय प्रवाह अबाधित ठेवणे, वारकऱ्यांसाठी स्नानगृहे व शौचालये, पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणे, नदीच्या काठावरील वस्त्यांमधून निघणारे सांडपाणी यासाठी प्रक्रिया केंद्र उभारणे, तसेच नागरी घनकचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे, नदीकाठी वनीकरण करणे इत्यादी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. यासाठी शासनाने आतापर्यंत रुपये ३४.६५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. यामध्ये माळीनगर येथील सांडपाणी व्यवस्थापनासाठी रुपये १ कोटी, गुरसाळे येथील सांडपाणी व्यवस्थापनासाठी रुपये ८० लाख व गोपाळपूर गावाच्या ट्रंक मेनच्या कामासाठी रुपये ८०.६५ लाख इतका निधी विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे वितरीत केला आहे.

**************************

H-1299-1A

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक २०७६.</u>

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा. श्री. समाधान अवताडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-**

"माझ्या पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील मंगळवेढा शहराची स्वतःची अशी ऐतिहासिक ओळख असणे, संपूर्ण राज्याचे दैवत असलेले श्री विठ्ठलाचे मंदिर श्री क्षेत्र पंढरपूर येथे वसलेले असून पंढरपूर शहराच्या जवळच असलेले मंगळवेढा शहर या शहराची ओळख संतांची भूमी अशी असणे, सदर भूमीत जगत ज्योती श्री बसवेश्वर महाराज, श्री संत दामाजीपंत, श्री संत चोखामेळा, श्री संत कान्होपात्रा संत चोखोबाच्या पत्नी संत सोयराबाई बहिण संत निर्मळा मुलगा संत कर्ममेळा मेहुना संत बका संत लती बुवा संत टीकाचार्य यांच्यासह इतर काही काळ स्वामी समर्थ अक्कलकोट वास्तव्याने व पदस्पर्शाने पावन झालेली असणे, एकीकडे पंढरपूर शहर देवाची भूमी म्हणून परिचित असणे यामुळे या दोन्ही शहरात दरवर्षी राज्यातून नव्हे तर कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यांतून लाखो भाविक व अनुयायी दर्शनासाठी येत असणे, तसेच जगत ज्योती श्री बसवेश्वर महाराज यांचे नियोजित जागतिक दर्जाचे स्मारक देखील मंगळवेढा शहरात उभारण्यात येणार असणे, या सर्व संतांचे प्रत्यक्षात वास्तव्य या शहराला लाभलेले असताना देखील संतांनी प्रत्यक्षात समाजात प्रबोधनासाठी केलेले महान कार्य, समाज प्रबोधन जाणून घेण्यासाठी केवळ नावाला छोटी समाधी मंदिर उपलब्ध असणे, यामुळे आजच्या व भविष्यात येणाऱ्या पिढीला संतांच्या महान कार्यपासून, प्रबोधनपासून आपल्या संस्कृती पासून वंचित रहावे लागणार असणे, याकरता मंगळवेढा शहरात संतांनी केलेले कार्य त्यांनी केलेले समाज प्रबोधन त्यांच्या जीवनपट अशी संपूर्ण माहिती असलेली संतसृष्टी निर्माण करण्याची गरज निर्माण होणे, त्या स्वरूपाची मागणी सातत्याने होऊन देखील तत्कालीन शासनाने याकडे दुर्लक्ष केलेले असणे, सदर संतसृष्टी निर्माण झाल्यास याचा फायदा मंगळवेढा शहरातील व सभोवतालच्या गावांतील पर्यटन वाढीच्या दृष्टीने होऊन स्थानिक रोजगाराला देखील चालना मिळणार असणे, सबब मंगळवेढा शहरात संतसृष्टी उभारण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कारवाई व उपाय योजना..."

<u>श्री. एकनाथ शिंदे, मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाच्या ग्रामविकास विभागाने तत्कालिन मा.पालकमंत्री, जिल्हा सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केली होती. सदर समितीच्या दिनांक ९/४/२०१७ व दिनांक ८/२/२०१८ रोजी बैठका झाल्या. त्यानंतर यासंदर्भात तत्कालिन मा.वित्त मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १/११/२०१८ रोजी बैठक झाली. त्यामध्ये महात्मा बसवेश्वर यांचे स्मारकाचा रुपये २५ कोटीच्या मर्यादेत आराखडा तयार करुन सादर करण्याचे ग्रामविकास विभागास निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक करण्याचा रुपये २५ कोटी रक्कमेचा आराखडा तयार करुन दिनांक १७/५/२०१९ रोजी ग्रामविकास विभागास सादर केला. त्यामध्ये जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा ३० मीटर उंचीचा पुतळा उभारणे, बसव सृष्टी हॉल, ध्यान मंदिर, प्रशासकीय इमारत, महात्मा बसवेश्वर ऑडीओ

व्हिज्युअल रुम इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आली होती. सदर प्रस्ताव मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीसमोर सादर करण्यासाठी दिनांक १९/७/२०१९ रोजी बैठक देखील आयोजित करण्यात आली होती. तथापि, सदर आराखडा अंतिम झालेला नाही.

दरम्यानच्या कालावधीत मंगळवेढा येथे संत चोखामेळा यांचे स्मारक उभारणे यासाठी रुपये २५ कोटी रक्कमेचा आराखडा तयार करण्याचे जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये संत चोखामेळा यांचे स्मारक उभारणे, सभामंडप, बहुदेशीय सभागृह, अभ्यास केंद्र, भक्त निवास, रस्ते, वाहनतळ, शाळा बांधणे, रस्ते सुशोभीकरण इत्यादी कामे करण्याचे त्यांचे नियोजन आहे.

दरम्यान आता लक्षवेधीमध्ये मंगळवेढा शहरात जगतज्योती श्री बसवेश्वर महाराज, श्री संत दामाजी पंत, श्री संत चोखामेळा, श्री संत कान्होपात्रा, संत चोखोबाच्या पत्नी संत सोयराबाई, बहिण संत निर्मळा, मुलगा संत कर्ममेळा, मेव्हुणा संत बका संत लती बुवा संत टीकाचार्य या सर्व संतांच्या कार्यासंदर्भातील समाज प्रबोधनाचे जीवनपट दर्शविणारी व त्यासंदर्भात संपूर्ण माहिती दर्शविणारी संतसृष्टी निर्माण करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या स्तरावर सदर बाब तपासून, यासाठी आवश्यक असलेली जागा निश्चिती तसेच संत सृष्टी निर्माण करण्याच्या अनुषंगाने आराखडा, तसेच सदर आराखड्यातील कामाची अंमलबजावणी यंत्रणा इत्यादी बाबी निश्चित करुन शासनास सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे जिल्हाधिकारी, सोलापूर यांना कळविण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे.

**************************

H-1300

लक्षवेधी सुचना क्र.२०३८

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. जितेश अंतापूरकर, श्री. विजय वडेट्टीवार श्री. सुनिल केदार, श्री. बळवंत वानखडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०३८ पुढील प्रमाणे आहे-**

"राज्यातील सुमारे अडीच ते तीन हजार महिलांची ओमान व दुबई या देशात मानवी तस्करी झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, राज्यातील महिलांना परदेशात काम देतो सांगुन त्यांना परदेशात गेल्यावर या महिलांकडून त्यांची कागदपत्रे, फोन काढून घेतले जातात आणि त्याचा छळ करीत डांबून ठेवले जात असणे, याप्रकरणी राज्य महिला आयोग आपल्या दरबारी या उपक्रमातून श्रीमती चाकणकर यांनी अहमदनगर मध्ये जाऊन महिलांच्या तक्रारी घेऊन जनसुनावणीही घेणे, तसेच प्रकरणी परराष्ट्र मंत्रालयाशी महिला आयोगाने पत्रव्यवहारही केलेला असणे, परराष्ट्र मंत्रालयाने या महिलांची येत्या ५ ते ६ महिन्यात सुटका करण्यात येईल असे आश्वासनही देणे, या व अशा वाढत्या घटना लक्षात घेता राज्यातील परदेशी जाऊ इच्छिणाऱ्या महिलांमध्ये निर्माण झालेली भितीचे वातावरण, दोषींवर त्वरीत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

ओमान व दुबई या देशात मानवी तस्करी झाली असल्याबाबत खालीलप्रमाणे दोन गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

१) फिर्यादीस चांगल्या पगाराची नोकरी देतो असे सांगून विमानाने ओमान देशात मस्कत येथे पाठवून, ओमान देशातील एजंटद्वारे मस्कत येथे त्यांची विक्री करुन अपव्यापार केल्याप्रकरणी मिरा भाईंदर वसई विरार घटकात काशिमीरा पोलीस ठाणे गु.र.नं..१३२/२०२३, कलम ३७०, ४२०, ३४ भा.द.वि. प्रमाणे दिनांक २१.०२.२०२३ रोजी गुन्हा दाखल आहे. गुन्ह्यातीन दोन आरोपींपैकी एक आरोपी अटक आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

२) फिर्यादीच्या अज्ञानपणाचा फायदा घेवून कामासाठीचा व्हिसा न काढता टुरिस्ट व्हिसा काढून त्यांना दरमहा रु.४०,०००/- पगाराचे स्वयंपाक कामाचे अमिष दाखवून त्यांना ओमान देशात पाठवून ओमान देशातील मस्कत येथे विक्री करुन अपव्यापार केल्याप्रकरणी खडक पोलीस ठाणे शहर येथे गु.र.नं.२५५/२०२३, भा.द.वि. ३७०, ४२०, ३४ प्रमाणे दिनांक १८.०७.२०२३ रोजी गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्यातील तीन संक्षयितआरोपींचा शोध सुरु असून गुन्हा तपासाधिन आहे.

राज्य महिला आयोग, मुंबई यांचेकडून प्राप्त तक्रारीवर कलम ३७० भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग यांनी चौकशी करुन सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दि.१८.०७.२०२३ रोजी खडक पोलीस ठाणे येथे भादवि कलम ३७०, ४२०, ३४ अन्वये ०३ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अहमनगर घटकातील पोलीस स्टेशनचे अभिलेखावर सदरबाबत गुन्हे दाखल नाहीत.

**राज्यात अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-**

१) राज्यात महिला व बालकांच्या अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने एकूण ४५ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. (त्यामध्ये त्या त्या घटकांच्या हद्दीतील रेल्वे पोलीस ठाण्याचा समावेश करण्यात आलेला आहे.)

२) अनैतिक मानवी वाहतुकीला आळा घालण्याकरीता व अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ कायद्याबाबत परिणामकारक अंमलबजावणी करणेकरीता तसेच "अनैतिक मानवी वाहतुक" या विषयावर कायदेशीर मार्गदर्शन करणेकरीता वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.

३) राज्यातील सर्व पोलीस घटकात कलम ३७० भादवि अन्वये दाखल सर्व गुन्ह्यांचे तपासावर बारकाईने नियंत्रण ठेवण्यासाठी व कलम ३७० भादवि अन्वये दाखल गुन्ह्यांचा आढावा घेण्यासाठी सर्व पोलीस घटकांचे AHTU प्रमुख (Incharge) यांचेसोबत प्रत्येक महिन्याचे पहिल्या सोमवारी VC (व्हिडीओ कॉन्फरन्स) द्वारे आढावा घेण्याबाबत सर्व पोलीस घटकांना सुचित करण्यात आले.

---

लक्षवेधी सुचना क्र.२१३८

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**कुमारी आदिती तटकरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१३८ पुढील प्रमाणे आहे-**

"रायगड जिल्ह्यातील पनवेल रेल्वेस्थानकात प्लॅटफॉर्मवर झोपलेल्या तीन वर्षीय मुलीचे अपहरण करुन तिच्यावर अत्याचार केल्याची घटना, तलासरी तालुक्यात १० वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन गळा दाबून तिची हत्या झाल्याची क्रुर घटना, डोंबिवली येथे इस्त्रीवाला कपडे इस्त्री करण्यासाठी आलेल्या महिला, तरुणींकडून इस्त्रीवाल्याने मोबाईल क्रमांक घेऊन त्यांना व्हॉट्सअॅपवर अश्लील मेसेज पाठविण्याची घटना, तसेच दुरान्तो नागपूर-मुंबई ट्रेनमध्ये एका महिलेची टी.सी.ने विनयभंग केल्याची घटना याबाबत सी.एस.एम.टी लोहमार्ग येथे गुन्हा दाखल केला असणे, अशा अनेक घटना वारंवार राज्यात घडत असणे, राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढत्या औद्योगिक वसाहती, त्यामुळे शहरातून वाढलेली गुन्हेगारी, अपुरी पोलिस व्यवस्था, त्यामुळे महिलांवरील अत्याचारांचे वाढलेले प्रमाण, पोलिसांच्या अपुऱ्या संख्येमुळे तपासणीस होणारा विलंब, परिणामी महिलांना न्याय मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे महिलांमध्ये सरकारबद्दल अविश्वास व महिलांमध्ये पसलेला अंसंतोष, याबाबत महिला सुरक्षा धोरणाची शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पनवेल रेल्वे स्टेशन फ्लाटफार्म नं. १ च्या पश्चिम बाजूस सिमेंट स्लिपरचे बाजूला ३ वर्षाची मुलगी विना कपड्याची बेशुध्द अवस्थेत मिळून आली. तिचेवर अत्याचार झाला असल्याने पनवेल रेल्वे पोलीस ठाणे गु.र.नं.८१/२०२३, कलम ३६३, ३६६ (अ), ३७६ (२) (I), ३७६ (अ), ३७७ भा.दं.वि. सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम सन २०१२ कलम ४, ६, १०, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन आरोपीताविरुध्द दि.२३.०३.२०२३ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

तलासरी तालुका, जिल्हा पालघर येथील अल्पवयीन मुलगी दि.०१.०३.२०२३ रोजी सकाळी ९.०० वा. चे सुमारास शाळेत गेली, परंतु ती परत आली नाही. तिच्या आई-वडीलांनी आजुबाजुस तसेच नातेवाईकाकडे शोध घेतला असता ती मिळून आली नाही. मुलीचा शोध घेताना इमामी (झंडु बाम) कंपनी डोंगरी येथील सी.सी.टी.व्ही. फुटेज पडताळणी केली असता आरोपी तिला मोटार सायकलवर बसवून पळवून घेवून जात असल्याचे आढळले. आरोपीने तिचेवर अत्याचार करुन करंमबेली ते तुंब रोडच्या पूर्व बाजूस झाडी झुडपात नेवून तिची हत्या करुन फेकून दिल्याप्रकरणी तलासरी पोलीस ठाणे, जि. पालघर येथे दि.०२.०३.२०२३ रोजी गुन्हा रजि. नं.६२/२०२३, कलम ३६३, ३०२, २०१, ३७६ सह लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६,



[क्र. मा.प

८, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन आरोपीताविरुध्द दि.२८.०४.२०२३ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

दि.२७.०२.२०२३ रोजी २१.१५ वा. ते दि.२८.०२.२०२३ रोजी ०८.३० वा. सुमारास सी.एस.एम.टी. रेल्वे स्टेशन दरम्यान नागपूर ते सी.एस.एम.टी. अप १२२९० दुरंतो एक्सप्रेसमध्ये महिला प्रवास करीत असताना टिकिट निरीक्षक यांनी महिलेचा विनयभंग केल्यामुळे सी.एस.एम.टी. रेल्वे पोलीस ठाणे गु.र.नं. १८७/२०२३, कलम ३५४, ३५४ अ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस दि.२८.०२.२०२३ रोजी सी.आर.पी.सी. कलम ४१(१) प्रमाणे नोटीस देण्यात आलेली आहे.

ठाणे आयुक्तालय अंतर्गत डोंबिवली येथे इस्त्रीवाला कपडे इस्त्री करण्यासाठी आलेल्या महिला, तरुणींकडून इस्त्रीवाल्याने मोबाईल क्रमांक घेवून त्यांना व्हॉस्टअपवर अश्लिल मेसेज पाठविण्याची घटना घडलेली नाही.

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ११,२३,७३,९७२ इतकी आहे. महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे मंजूर पोलीस बल २,२१,६२१ इतके आहे. त्यामध्ये कार्यरत पोलीस दल १,९०,९३१ इतके आहे. वाढती लोकसंख्या व औद्योगिक वसाहती यामुळे पोलीसांवरील कामाचा ताण वाढत आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेकडून i Call helpline द्वारे पोलीसांसाठी मानसिक स्वास्थ्याबाबत विषेशतज्ञाकडून सल्ला व माहिती देण्यासंदर्भात जिल्हास्तरावर कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. सर्व पोलीस घटक प्रमुख यांनी त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी/अंमलदार यांची सेवाभावी वैद्यकीय संस्था/इतर एन.जी.ओ. यांचेकडून वैद्यकीय तपासणी करण्यात यावी अथवा घटक पोलीस कल्याण निधीतून खर्च करुन वैद्यकीय तपासणी करण्यात यावी याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहे. महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी या उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्यात महिला अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहेत. महिला हेल्पलाईन क्र. १०३, १०९१, ११२ कार्यरत असून त्याद्वारे महिलांना २४*७ मदत देण्यात येते. पिडित महिलेला मनौधेर्य योजनेंतर्गत आर्थिक मदत दिली जाते.

---

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक २२०७</u>

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२०७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यात परभणी जिल्ह्यातील तत्कालिन पोलीस अधिक्षक यांनी पोलीस कल्याण निधीमध्ये मोठा गैरव्यवहार केल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना माहे डिसेंबर, २०२२ मध्ये स्वयंस्पष्ट निवेदन देणे, शासकीय कार्यालयाकरिता साहित्य खरेदी करीत असताना जी.ई.एम. पार्टलमधून खरेदी करणे अपेक्षित असणे, परंतु तत्कालिन पोलीस अधिक्षकांनी असे न करता टि.व्ही. आणि संगणक खरेदी करता वेलफेअर फंडाचा वापर करून चुकीचा पायंडा पाडलेला असणे, सदर खरेदीचे देयके अथवा नोंद कोणत्याही रेकॉर्डवर घेण्यात आलेली नसणे, व त्यासाठी शासकीय प्रक्रीयेचा अवलंब केलेला नसणे, त्यामुळे शासकीय खरेदी करताना नोटसीट बनवावी लागते, परंतु तसेही करता आलेले नसणे, त्यामुळे खरेदी करण्यात आलेले टि.व्ही. त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात येणे, पोलीस कर्मचारी व अधिका-यांच्या महत्वाच्या (उदा. अपघात, आजारपण, अपघाती मृत्यू) कार्यासाठी वापरला जाणारा पोलीस कल्याण निधीचा वापर स्वतःसाठीच केलेला असणे, या कामासाठी वेलफेअर फंडासाठी लाखो रुपयांची एफडी मोडली, याचे सुध्या रेकॉर्ड उपलब्ध नसणे, तसेच पोलीस वेलफेअर फंडातून कोट्यावधी रुपयाचा निधी स्वतःसाठी व स्वतःच्या निवासस्थानी खर्च केलेला असणे, त्याचबरोबर कर्मचारी व अधिका-यांसाठी बनविण्यात आलेल्या नविन मंगल कार्यालयासाठी माती, रेती, सिमेंट, विटा खरेदी केले असे दाखवले असणे व त्याची लाखो रुपयांची देयके अदा केली असणे, परंतु हे त्यांच्या अधिकार क्षेत्रातील पोलीस स्टेशनकडून सदर बांधकाम साहित्य मोफत मागून घेतलेले असणे याची चौकशी होणे गरजेचे असणे, तसेच गुन्ह्याची माहिती भरणेसाठी सीआयडी क्रॉईम मार्फत सी.सी.टी.एन.एस. प्रणाली चालवली जाते, त्याच्यासाठी सुध्या ८ लक्ष रुपयाचा खर्च तत्कालिन पोलीस अधिक्षकांनी केला असणे, जे की संपुर्ण महाराष्ट्रामध्ये सी.सी.टी.एन.एस. कोठेही ८ रुपयाचा सुध्दा खर्च केलेला नसताना परभणी जिल्ह्यात लाखो रुपयांचा खर्च करणे, त्यामुळे याबाबतीत राज्य सरकारने सखोल विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### <u>मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन</u>

तत्कालीन पोलीस अधीक्षक, परभणी यांनी पोलीस कल्याण निधीमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत सन्मानीय विधानसभा सदस्यांनी दिनांक ३०/१२/२०२२ रोजी शासनास निवेदन सादर केले आहे. शासनाच्या दिनांक १६/०२/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे पोलीस महासंचालक यांना सदर तक्रार अर्जातील मुद्द्यांच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. प्रस्तुत प्रकरणी पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांनी दिनांक २३/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला असून सदर अहवाल पोलीस महासंचालक यांच्या अभिप्रायांसह प्राप्त झालेला नसल्यामुळे दिनांक

०४/०५/२०२३ च्या पत्राद्वारे हा अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवून त्यांना सविस्तर अभिप्राय देण्याबाबत कळविले आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या चौकशी अहवालाची छाननी पोलीस महासंचालक यांच्या स्तरावर सुरु आहे. या प्रकरणी, पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाकडून सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

******

लक्षवेधी सूचना क्रमांक २२९७

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.अतुल बेनके, विधानसभा सदस्य यांच्या लक्षवेधी सूचना क्र. २२९७ वरील निवेदन उप मुख्यमंत्री सभागृहासमोर ठेवतील :-

"मुंबईतील ग्रँटरोड (प), तुकाराम जावजी रोड, दत्तात्रय सहकारी गृहिमार्मण संस्थेची सदनिका क्रमांक्र ३/५५ मधील रहिवाशी सदनिकाधारक यांचेसह शेकडो भाडेकरु रहिवाशी कुटुंबांना कार्यकारी अभियंता, डी-२ डिव्हिजन, मुंबई इमारत दु. व पु. मंडळ, म्हाडा यांचेतर्फे ९५-ए अंतर्गत घरे रिक्त करण्याच्या दि.२७.२.२०२३ रोजी नोटीसा पाठविण्यात आल्याटे निदर्शनास येणे, कार्याकारी अभियंता यांचे कार्यालयात नोटीसचे उत्तर सादर करण्यासाठी रहिवाशी धारक गेले असता त्यांना नोटीस रद्द करायची असेल तर पुनर्विकासासाठी संमतीपत्रावर सह्या मागण्याची सक्ती कार्यकारी अभियंता आणि विकासक लोढा यांचे प्रतिनिधी यांनी सक्ती करण्यात आल्याचा घडलेला धक्कादायक प्रकार, सदरहू दत्तात्रय सहकारी गृहनिर्माण संस्थेचे म्हाडा अधिनियम प्रकरण ८-अ कलम १०३ (ब) अंतर्गत पूर्वी सादर केलेला प्रस्ताव रद्द झालेला नसताना व याबाबत सर्वोच्च न्यायायाची परवानगी नसताना तसेच सदरहू संस्थेचे भूसंपादन शासनाने परस्पर बेकायदेशीर रित्या रद्द केल्याचे प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे सन २०१४ पासून प्रलंबित असताना मायक्रो डेव्हलपर्स कंपनीच्या विकासकाने म्हाडाचे मुख्य अधिकारी व संबंधित अभियंता यांचेबरोबर संगनमत करून गृहनिर्माण संस्थेच्या रहिवाश्यांना पुनर्विकासासाठी सक्तीने कागदपत्रे सादर करण्याबाबत बेकायदेशीर रित्या नोटीसा पाठविण्यात आल्याने रहिवाशी कुटुंबांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण तयार होणे, तसेच उक्त सहकारी संस्थेच्या इमारतीत तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी यांनी त्यांचे भाऊ इमारत क्र. २ मध्ये रुम नं. ४२ हि सदनिका तसेच म्हाडाचे माजी अभियंता यांनी इमारत क्र. १ मध्ये रुम नं. १९ तर त्यांचा मुलगा यांनी इमारत क्र. ४ मध्ये रुम नंबर १ आदि तीन सदनिका म्हाडा व शासनाच्या अधिकाऱ्यांनी बेकायदा सदनिका खरेदी करण्यात येऊन सदरहू अधिकारी अभियंता यांनी सदरहू गृहनिर्माण संस्थेचे प्रकरण ८अ कलम १०३-ब चा प्रस्ताव कायद्यात बसत नसनाही दि.१०.०३.२०१६ रोजी भूसंपादन रद्द केल्याची आधिसूचना जारी करण्यासाठी सहभाग दर्शविण्यात आल्याचा प्रकार घडणे, एकंदरितच सदरहू गृहनिर्माण संस्थेचा १०३-ब चा प्रस्ताव रद्द झालेला नसताना व त्याकरिता मा. सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिलेली नसताना शासन व म्हाडाचे संबंधित अधिकारी आर्थिक संगनमताने विकासकाची एकतर्फी बाजू घेऊन संस्थेची इमारतीतील रहिवाशी कुटुंबांवर सक्तीने पुनर्विकास योजना लागू करीत असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने उच्च स्तरावरून चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

भूकर पाहणी क्र.३१० ताडदेव विभाग, येथील दत्तात्रय बिल्डींग, इमारत क्र.३४ए-३४बी, तुकाराम जावजी मार्ग, ग्रॅन्टरोड (प.), मुंबई-४०० ००७ या मालमत्तेचे म्हाड अधिनियम, १९७६ च्या प्रकरण ८-ए मधील कलम १०३-ब अंतर्गत भूसंपादीत करण्याकरिता विशेष भूसंपादन अधिकारी, म्हाडा यांच्यामार्फत दि.०५.०८.१९९४ रोजी कलम ९३(५) अन्वये अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, काही जमीनमालकांनी म्हाड अधिनियम, १९७६ च्या प्रकरण ८-अ अंतर्गत कलम १०३ (ब) च्या तरतुदींना मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करुन आव्हान दिले होते. त्यानुसार, या प्रकरणातील कलम १०३-ब अंतर्गत सर्व भूसंपादन प्रक्रियेवर मा.सर्वोच्च न्यायालयातर्फे दि.०१.०५.१९९६ रोजी स्थगिती देण्यात आली आहे.

विषयांकीत मालमत्तेवरील भाडेकरु/रहिवाशी यांनी दि.२५.०१.२०१२ अन्वये म्हाड अधिनियम, १९७६ च्या प्रकरण ८-अ अंतर्गत कलम १०३ (ब) अंतर्गत भूसंपादन रद्द करुन जमीनमालक व भाडेकरु / रहिवाशी यांनी विकास नियंत्रण नियमावली, विनियम ३३(७) अंतर्गत पुनर्विकास करण्याची विनंती केली होती. मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने म्हाड अधिनियम, १९७६ मधील कलम ९३(५) ची दि.०५.०८.१९९४ ची अधिसूचना रद्द करण्यापूर्वी मा.सर्वोच्च न्यायालयाची परवानगी घेण्यात यावी अथवा याचिकेतील सर्व पक्षांनी मा.सर्वोच्च न्यायालयासमोर consent team दाखल केल्यानंतर जर मा.सर्वोच्च न्यायालयाचे consent

team दाखल करुन घेऊन याचिका निकाली काढली तरच दि.०५.०८.१९९४ ची अधिसूचना निष्प्रभ / रद्द करण्याबाबत शासन पत्र, दि.१६.०८.२०१३ नुसार मान्यता देण्यात आली होती.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०४.१०.२०१३ रोजीच्या आदेशान्वये शासन पत्र, दि.१६.०८.२०१३ नुसार विशेष अनुमती याचिका क्र.१३४२८/१९९६ मधील Interlocutory Application क्रमांक १०/२०१३ नुसार मागे घेण्याची अनुमती देऊन निकाली काढली आहे. त्यानुसार, विशेष भूसंपादन अधिकारी, म्हाडा यांनी कलम १०३-ब अंतर्गत भूसंपादन रद्द करण्याबाबत दि.१०.०३.२०१६ रोजीची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली.

सदरहू मालमत्तेचा विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३(७) अंतर्गत जमीनमालक यांनी दाखल केलेला पुनर्विकासाचा प्रस्तावानुसार, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने भुकर पाहणी क्र.३१०, ताडदेव विभाग येथील दत्तात्रेय बिल्डींग या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी दि.२८.०४.२०१७ अन्वये जमीनमालकास ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले व तद्नंतर विकासकास दि.०२.११.२०२१ अन्वये सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सदरहू मालमत्तेच्या भूखंडाचे क्षेत्रफळ ९२९१.८६ चौ.मी. असून भूखंडावर एकुण ०७ इमारती आहेत. त्यामध्ये २७७ निवासी + ०१ (निवासी+अनिवासी) + १५ अनिवासी असे एकुण २९३ भाडेकरु/रहिवाशी प्रमाणित केले आहेत. २९३ भाडेकरु/रहिवाश्यांपैकी २५५ भाडेकरु/रहिवाशी (८७.०३ %) यांनी संमतीपत्रे सादर केली आहेत.

विकासकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दि.३०.१२.२०२१ अन्वये नकाशांना मंजूरी व आयओडी प्राप्त केली आहे. सदर पुनर्विकासासाठी असहमती असणारे भाडेकरु/ रहिवाशांनी करारनामा करुन जागा खाली करण्यास सहकार्य करत नसल्याने त्यांचेवर म्हाड अधिनियम ९५-अ अंतर्गत निष्कासनाची कार्यवाही करण्याबाबत विकासकाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास विनंती केली आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या कार्यकारी अभियंता/डी-२ यांचे कार्यालयात दि.१९.१०.२०२२ रोजी भाडेकरु/रहिवाशी यांची सुनावणी घेण्यात आली आहे. वेळोवेळी सदर असहकार्य करणाऱ्या भाडेकरु/रहिवाशी यांनी पत्राद्वारे मांडलेले मुद्दे विकासक यांना देण्यात आले असून सदर बाबतीत विकासक यांनी सादर केलेल्या खुलाशांची माहिती भाडेकरु/रहिवाशी यांना कार्यकारी अभियंता/डी-२ या कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पुनर्विकासास असहकार्य करणाऱ्या भाडेकरु/रहिवाशी यांच्या विरुध्द म्हाड अधिनियम, १९७६ मधील कलम ९५-अ अंतर्गत निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. श्री.जयंत गणपत कामत यांनी सदरहू म्हाड अधिनिमय ९५-अ अंतर्गत निष्कासनाच्या कारवाई विरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१४३७९/२०२३ दाखल केली होती. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.३१.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये याचिकाकर्त्यांची निष्कासनाच्या कार्यवाहीस अंतरिम स्थगिती देण्याची विनंती अमान्य केली आहे. श्री.प्रकाश वसंत केदार, श्रीमती जयश्री कापडीया, श्री.शशिकांत कापडीया, यांनी म्हाड अधिनियम ९५-अ अंतर्गत निष्कासन कार्यवाही विरोधात मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१५८७४/२०२३ दाखल केली असुन मा.उच्च न्यायालयाने दि.१५.०६.२०२३ रोजीच्या आदेशान्वये प्रकरणी अंतरिम स्थगिती दिली असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

या व्यतिरिक्त सदरहू मालमत्तेचे म्हाड अधिनियम, १९७६ मधील कलम १०३-ब अंतर्गत भूसंपादन रद्द करण्याच्या आदेशाविरुध्द श्री.तुकाराम नारायण अनावकर व इतर यांनी याचिका क्र.१९३५/२०१६ मधील चेंबर्स समन्स् २०५/२०१९, २०६/२०१६, १३८/२०१८, श्री.प्रकाश वसंत केदार व इतर यांनी याचिका क्र.८५४/२०१७ इत्यादी मा.उच्च न्यायालयात दाखल केल्या आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.०५ जुलै, २०२३ रोजी उक्त याचिकांमध्ये एकत्रित सुनावणी पुर्ण झाली आहे. मा.उच्च न्यायालयाने याबाबतचा निकाल राखून ठेवला आहे.

**********

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- २४६७**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

श्री. सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २४६७पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात "श्यामाप्रसाद मुखर्जी जनवन ही योजना राबवली जात असणे; या योजनेचा मोठया प्रमाणात निधी वनसमितीच्या खात्यात वळता झाला असूनही ही योजना जनतेला दिलासा देणारी ठरण्यापेक्षा खऱ्या अर्थाने वनकर्मचारी आणि वनसमित्यांच्या पदाधिकाऱ्यांना गब्बर बनवण्यासाठी मैलाचा दगड ठरली असणे; चंद्रपूर जिल्हाअंतर्गत मद्यचांदा वनविभागामार्फत कोठारी परीक्षेत्रात सप्टेंबर २०२२ पर्यंत एकूण वनसमित्या कार्यरत असणे ; गणपूर, काटवली, बामणी, कवडजई, आकसापूर, कारंजी, धानपूर, कन्हाळगांव, चिवंडा, आणि परसोडी येथील प्रत्येक वनसमितीच्या बँक खात्यात योजनेच्या अनुदानाची रक्कम २४ लाख २५ हजार जमा केली असणे ; कामाचे नियोजन वनसमितीच्या बैठकीत मंजूर करून खर्चाला मान्यता देखील त्यांच्याकडूनच घ्यावयाची असणे ; त्याचवेळी शासकीय नियमाला तिलांजली देत अधिकाऱ्यांची मर्जी राखून वनकर्मचारी व वनसमितीच्या पदाधिकाऱ्यांनी सदर योजनेच्या कामात बराच घोळ घेतल्याचे निष्पन्न होणे ; कोठारी परिक्षेत्रातील जनवन योजना प्रचंड वादात सापडली असणे ; येथे वनसमितीच्या मांगणीनुसार सैन्य प्रशिक्षण राबवण्यात आले, भ्रष्टाचाराचा संशय असलेल्या सहा महिन्यांच्या या प्रशिक्षणासाठी ५ च्या समित्यांनी सदर कामावर सप्टेंबर २०२२ पर्यंत तब्बल १३ लाख ६३ हजार रुपयांचा खर्च केला असणे ; मात्र प्रत्यक्षात हे प्रशिक्षण झालेच नसल्याची तसेच रेकॉर्डवरच प्रशिक्षणाची सांगता झाल्याचे उघडकीस येणे ; संपूर्ण बोगस लाभार्थ्यांची नांवे समोर करून त्यांना कुठलेही प्रशिक्षण न देता शासनाचा निधी फस्त करण्यात आल्याची धक्कादायक बाब उजेडात येणे ; याप्रकरणी कोणतीही चौकशी करून कारवाई करणेबाबतीत होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे स्थानिक जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

**निवेदन**

वन-वन्यजीव संरक्षण व संवर्धनाकरीता संरक्षित क्षेत्रा लगतच्या गावात परिस्थितीकीय विकास कार्यक्रमांव्दारे गावांचा सर्वांगिण विकास करून मानव-वन्यजीवांसह जिवन प्रस्थापित करण्यासाठी शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएलपी- ०५१५/प्रक्र.१५५/फ-१, दि. ०४.०८.२०१५ अन्वये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर योजने अंतर्गत समाविष्ठ करण्यात येणा-या गांवामध्ये वन-वन्यजीव संवर्धनामध्ये स्थानिक ग्रामस्थांचा सहभाग घेऊन संयुक्त वनव्यवस्थापन / ग्राम परिस्थितीकीय विकास समितीच्या सभेमध्ये सुक्ष्म आराखडयाला ठरावाद्वारे मंजुरी देण्यात येते. शासनाच्या विविध विभागाच्या योजनेतील तरतुदींची सांगड (Convergence) घालुन गावांचा विकास कराणे, ग्रामस्थांचे वनावरील अवलंबिता कमी करणे व स्थानीक युवकांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे इत्यादी कामे सदर योजनेंतर्गत राबविण्यात येतात.

प्रशिक्षण मार्गदर्शन सैन्य, पोलिस भरती पुर्व प्रशिक्षण अकॅडमी, बल्लारपूर यांचे मार्फत माहे मे, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत सैन्य/पोलिस भरतीच्या पार्श्वभुमीवर कोठारी परिक्षेत्रातील काटवली (बामणी), गणपुर, कवडजई, आक्सापूर व करंजी या ५ संयुक्त वन व्यवस्थांपान समित्यातील एकूण ४७ लाभार्थांना फार्म भरणे, स्पर्धा परिक्षा देणे, शारीरीक क्षमता तयार करणे इत्यादी गोष्टीचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्याकरीता निवास भोजन व्यवस्थेसह प्रति प्रशिक्षणार्थी रु. २९०००/- (रु. एकोनतिस हजार) प्रमाणे संबंधित संयुक्त वनव्यवस्थापन समीती यांनी प्रशिक्षण मार्गदर्शन सैन्य, पोलिस भरती पुर्व प्रशिक्षण अकॅडमी, बल्लारपूर या संस्थेस अदा केले आहेत.

******

# महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २५३२

**डॉ. राजेंद्र शिंगणे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२५३२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"बुलढाणा जिल्हयातील सिंदखेडराजा हे राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थानाने पावन झालेली नगरी मागील अनेक वर्षापासून सिंदखेडराजा हा या ऐतिहासिक आणि पौराणिक वास्तुचा समावेश असलेल्या राज्य पुरातत्व विभाग व केंद्रीय पुरातत्व विभाग यांच्या अधिनस्त असलेल्या व सिंदखेडराजा गावाच्या विकासासंबंधात अनेक आराखडे तयार होणे, परंतु शासनाकडून आवश्यक निधी प्राप्त न होणे, त्यामुळे अर्धवट राहिलेला सिंदखेडराजा या नगरीचा विकास व त्यामुळे इतिहासप्रेमी तसेच सर्वसामान्य नागरीक यांच्यामध्ये असलेले तीव्र नाराजी, मातृतीर्थ सिंदखेडराजाचा विकास व्हावा यासाठी तत्कालीन उप मुख्यमंत्री यांनी दिनांक २१ मे, २०२२ रोजी स्वत: सिंदखेडराजा येथे येवून संपूर्ण वास्तु पाहणी करण्यात येणे, त्यानंतर पुरातत्व विभाग, नगरपरिषद प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रिडा विभाग, महसूल विभाग, वन विभाग यांची बैठक घेण्यात येणे आणि सुधारित मातृतीर्थ सिंदखेडराजा विकास आराखडा तयार करावा अशा सूचना दिलेल्या असणे, त्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही, सुधारित विकास आराखडा तयार करण्यात आला असेल तर तो कितीचा झाला त्याची विभागनिहाय असलेली माहिती सुधारित विकास आराखडा तयार झाला नसेलतर तो कधीपर्यंत तयार करण्यात येईल, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मंत्री, (पर्यटन) यांचे निवेदन

१. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, दि.३१.०३.२०१७ अन्वये सिंदखेडराजा, जि. बुलडाणा येथील राजमाता जिजाऊ जन्मस्थळ, सिंदखेडराजा पर्यटन विकासाच्या रु.२४.९३ कोटीच्या आराखड्यास शासन निर्णय, नियोजन विभाग दि.०४.०६.२०१५ आणि दि.१९.०७.२०१६ मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात आली आहे. सदर विकास आराखड्यातील लखुजीराव जाधव राजवाडा, सावकारवाडा, रंगमहल, निळकंठेश्वर मंदिर व काळाकोट या पाच स्थळांच्या जतन व दुरुस्तीची रु.१२.९६ कोटीची कामे राज्य पुरातत्व विभागामार्फत पूर्ण करण्यात आली आहेत.

२. सिंदखेड राजा पुरातन व संवर्धन तसेच शहराच्या भाविक /उद्योग/ पर्यटन या दृष्टीने विकास होण्यासाठी सर्व आवश्यक बाबींचा समावेश करुन आवश्यक निधीच्या माहितीसह रु.१८०.६६ कोटी रकमेचा सिंदखेड राजा विकास आराखडा जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्यामार्फत तयार करण्यात येऊन आराखड्याच्या अंमलबजावणीकरीता शेगाव व लोणार विकास आराखड्याच्या धर्तीवर विभागीय किंवा जिल्हास्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यासाठी सदर आराखडा जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्यामार्फत दि.०७.०४.२०२२ च्या पत्राने नियोजन विभागाकडे सादर करण्यात आला आहे.

३. तत्कालीन वित्त व नियोजन मंत्री यांनी सिंदखेड राजा येथे घेतलेल्या आढावा बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार राज्य पुरातत्व विभागाच्या व केंद्रीय पुरातत्व विभागाच्या स्मारकांचा एकत्रितरित्या विकास प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी सिंदखेड राजा नगरपरिषदेमार्फत वास्तुविशारदाची निवड करण्यात आली असून दि.२५.०८.२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

* * * * *

रोटा/एच-१३१५[७५०-१०-२०२३].